SAMPLE CONTENT

PRO lingo

# मराठी (HL)

# व्याकरण व लेखन



## इयत्ता सहावी

(मराठी माध्यम)

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित पाठ्यपुस्तकावर आधारित.

# मराठी (HL)
# व्याकरण व लेखन
## इयत्ता सहावी (मराठी माध्यम)

Sample Content

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठ्यपुस्तकातील व्याकरण व लेखनावर आधारित कृती समाविष्ट
- व्याकरण विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- व्याकरण विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- उत्तरे लिहिण्याकरिता पर्याप्त जागा उपलब्ध
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरिता उत्तरसूची समाविष्ट
- लेखन विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- लेखन विभागातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती
- लेखन विभागातील घटकांमध्ये आवश्यक तेथे सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2022MH0007
**TEID: 3425**
P.O. No. 11119

# प्रस्तावना

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील प्रत्येक टप्पा महत्त्वाचा असतो. इयत्ता सहावीचे वर्षही विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत भाषा महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे, मराठी विषयात उत्तम गुण मिळवण्यासाठी, व्याकरण घटकांचा सखोल अभ्यास करण्याची सवय लागावी यासाठी, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी **लेझी बोन एज्युकेशनचे मराठी (HL) व्याकरण व लेखन इयत्ता सहावी** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती सोपवताना आम्हांला आनंद होत आहे.

व्याकरणाच्या पायावर भाषेची इमारत उभी राहते. हा पाया मजबूत असेल, तर भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे जाते, तसेच व्याकरणात अधिकाधिक गुण मिळवणे सहज शक्य होते. यासाठी व्याकरण घटकांच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांची ही गरज ओळखून आम्ही या संकल्पनांचे सहज सोप्या भाषेत स्पष्टीकरण देण्याबरोबरच भरपूर सरावकृती समाविष्ट केल्या आहेत. शब्दसंपत्ती व व्याकरणावरील विद्यार्थ्यांची पकड मजबूत होईल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

लेखन विभागात नवनिर्मितीचा आनंद दडलेला असतो. विद्यार्थ्यांना स्वभाषेत लिखाणास प्रवृत्त करणे हा या अभ्यासामागील मूळ उद्देश आहे. लेखन विभागामध्ये समाविष्ट घटकांचे लेखन कसे करावे? कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात? यासंदर्भातील सविस्तर विवेचन प्रत्येक घटकाच्या प्रारंभी देण्यात आले आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी अनेक नमुना कृतींनी यातील सारे घटक समृद्ध करण्यात आले आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव मिळेल याची आम्हांला खात्री आहे.

व्याकरणावर आधारित भरपूर कृती, लेखन विभागातील २१ निबंध, ६ पत्र, ९ कथा, ६ संवाद, ६ मुलाखतीकरिता प्रश्नावली, ४ जाहिराती, ४ बातमी लेखन व आकलन, ४ गद्य आकलन, ५ सूचनाफलक, घोषवाक्ये, अनुलेखन, निमंत्रण पत्रिका, कार्यक्रमाचा ओघतक्ता एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरिता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती :** प्रथम

हे पुस्तक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय support@lazybone.in या इ-मेल पत्त्यावर पाठवावा, ही नम्र विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी बालभारती, सहावे पुनर्मुद्रण: २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **व्याकरण विभाग** | |
| १. | शब्दांच्या जाती | |
| • | नाम | १ |
| • | सर्वनाम | ४ |
| • | विशेषण | ७ |
| • | क्रियापद | ११ |
| २. | विभक्ती प्रत्यय | १५ |
| ३. | उपसर्ग आणि प्रत्यय | १८ |
| ४. | काळ | २२ |
| ५. | समानार्थी शब्द | २५ |
| ६. | विरुद्धार्थी शब्द | २८ |
| ७. | लिंग | ३१ |
| ८. | वचन | ३४ |
| ९. | वाक्प्रचार | ३८ |
| १०. | लेखननियम | ५६ |
| ११. | विरामचिन्हे | ६१ |
| १२. | म्हणी | ६५ |
| १३. | शब्दसंपत्ती | ६८ |
| • | सराव कृतिपत्रिका - १ | ८२ |
| • | सराव कृतिपत्रिका - २ | ८४ |
| • | उत्तरे | ८६ |
| | **लेखन विभाग** | |
| १. | निबंधलेखन | १०५ |
| २. | पत्रलेखन | ११३ |
| ३. | कथालेखन | ११८ |
| ४. | संवादलेखन | १२३ |
| ५. | मुलाखत | १२६ |
| ६. | जाहिरात | १२९ |
| ७. | बातमीलेखन | १३४ |
| ८. | गद्य आकलन | १३५ |
| ९. | सूचनाफलक | १३८ |
| १०. | घोषवाक्ये | १४२ |
| ११. | अनुलेखन | १४४ |
| १२. | निमंत्रण पत्रिका | १४५ |
| १३. | कार्यक्रमाचा ओघतक्ता | १४६ |


**[टीप : पाठ्यपुस्तकातील व्याकरण व लेखनावर आधारित प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

Sample Content

# व्याकरण विभाग

## १ शब्दांच्या जाती

आपण आपल्या मनातील भावना वाक्यरूपाने प्रकट करतो. वाक्य हे शब्दांचे बनलेले असते. आपण बोलताना अथवा लिहिताना वेगवेगळ्या शब्दांचा उपयोग करतो.

**शब्दांच्या कार्यानुसार त्यांना वेगवेगळी नावे देण्यात आली आहेत. त्यांना 'शब्दांच्या जाती' म्हणतात.** एकूण शब्दांच्या जाती आठ आहेत.

**वाक्यात उपयोग करताना ज्या शब्दांच्या रूपात बदल होतो त्यांना 'विकारी किंवा सव्यय शब्द' म्हणतात.**

**वाक्यात उपयोग करताना ज्या शब्दांमध्ये मुळीच बदल होत नाही त्यांना 'अविकारी किंवा अव्यय शब्द' म्हणतात.**

**शब्दांच्या जाती**

| **विकारी शब्द (सव्यय)** | | **अविकारी शब्द (अव्यय)** | |
|---|---|---|---|
| १. नाम | २. सर्वनाम | ५. क्रियाविशेषण अव्यय | ६. शब्दयोगी अव्यय |
| ३. विशेषण | ४. क्रियापद | ७. उभयान्वयी अव्यय | ८. केवलप्रयोगी अव्यय |

### नाम

[**टीप :** या वर्षीच्या अभ्यासक्रमात आपण विकारी शब्दांचा अभ्यास करणार आहोत.]

**कोणत्याही व्यक्तीचे, वस्तूचे, जागेचे, पशुपक्ष्यांचे आणि मनातील भावनांना दिलेले नाव म्हणजे 'नाम' होय.**

**उदा.** महेश आणि रमेश शाळेत जाताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

या वाक्यात 'महेश', 'रमेश', 'शाळा', 'चेहरा', 'आनंद' ही नामे आहेत. नामांचे तीन प्रकार पडतात.

**नामांचे प्रकार**

- सामान्यनाम
- विशेषनाम
- भाववाचकनाम

**सामान्यनाम -** ज्या नामातून एकाच प्रकारातील किंवा जातीतील सर्व वस्तूंचा, व्यक्तींचा बोध होतो म्हणजेच त्यांच्यात समान गुणधर्म, सारखेपणा जाणवतो ; त्यांना 'सामान्यनाम' म्हणतात.

**उदा.** व्यक्ती, गाव, नदी, पर्वत, पक्षी, प्राणी इत्यादी.

**विशेषनाम -** ज्या नामातून विशिष्ट व्यक्ती किंवा वस्तूचा बोध होतो ; त्यांना 'विशेषनाम' असे म्हणतात.

**उदा.** राम, लक्ष्मण, कृष्ण, रावण, गंगा, सरस्वती, यमुना, मुंबई, पुणे, ठाणे, हिमालय, सह्याद्री इत्यादी.

**भाववाचकनाम -** ज्या नामातून आपल्याला वस्तू, व्यक्ती, पदार्थ यांच्यातील भाव, गुणधर्म व स्वभाववैशिष्ट्ये यांचा बोध होतो ; त्यांना 'भाववाचकनाम' असे म्हणतात. भाववाचकनाम दृश्य स्वरूपात नसतात.

**उदा.** गोडवा, गारवा, आनंद, सौंदर्य, शौर्य इत्यादी.

Sample Content

## सराव कृती

***१. खालील नामांचे दिलेल्या सारणीमध्ये योग्य वर्गीकरण करा.**

सतलज, बाग, कविता, लाडू, आंबेगाव, शाळा, कीटक, झेंडा, लाकूड, प्राजक्ता, मराठी, आई, कापड, बंडू, सह्याद्री.

उत्तर :

| | |
|---|---|
| **सामान्यनाम** | ------------------------------------------------ |
| **विशेषनाम** | ------------------------------------------------ |

***२. खालील यादी (विशेषनामे) पूर्ण करा.**

i. व्यक्तींची नावे – ------------------------------------------------

ii. गावांची नावे – ------------------------------------------------

iii. नद्यांची नावे – ------------------------------------------------

iv. पर्वतांची नावे – ------------------------------------------------

**३. खालील वाक्यांतील भाववाचक नामे ओळखा.**

i. मला सशाची चपळाई आवडली. – ----------------------------------

ii. त्याची आई माझ्याशी आपुलकीने बोलली. – ----------------------------------

iii. नीताच्या आवाजात गोडवा आहे. – ----------------------------------

iv. कोणालाच गुलामगिरीत राहणे पसंत नसते. – ----------------------------------


***४. खालील वाक्यात सहा नामे आली आहेत. ती नामे लिहा.**

माधव आणि सरिता रस्त्याने खोडकरपणा न करता शाळेतून घरी परतले.

उत्तर : | ---------- | ---------- | ---------- | ---------- | ---------- | ---------- |

***५. खालील चित्रांच्या समोर सामान्यनाम, विशेषनाम, भाववाचकनाम लिहा.**

**उदा.**




सामान्यनाम - फूल

विशेषनाम - गुलाब

भाववाचकनाम - सौंदर्य

i.



सामान्यनाम - ----------

विशेषनाम - ----------

भाववाचकनाम - ----------

ii.



सामान्यनाम - ----------

विशेषनाम - ----------

भाववाचकनाम - ----------

Sample Content

## *६. खाली काही सामान्यनामे, विशेषनामे व भाववाचकनामे दिली आहेत. खालील तक्त्यात त्यांचे वर्गीकरण करा.

**नामे -** देशमुख, चांगुलपणा, कडधान्य, कळसूबाई, पर्वत, वात्सल्य, शिखर, फूल, नवलाई, आडनाव, माणुसकी, हिमालय, मुलगी, नम्रता, जास्वंद, मटकी, सविता.

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
|---|---|---|
| ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |
| ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |
| ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |

## ७. खाली दिलेल्या वाक्यांतील अधोरेखित नामांचे प्रकार ओळखा.

*i. <u>मनाली</u> <u>मुंबईहून</u> तिच्या <u>गावी</u> गेली.

*ii. <u>मुलांच्या</u> <u>हलगर्जीपणामुळे</u> <u>इस्त्रीची</u> <u>वायर</u> जळाली.

*iii. <u>सुधीरला</u> <u>पुरणपोळी</u> आवडते.

*iv. <u>ताजमहालचे</u> <u>सौंदर्य</u> काही निराळेच आहे.

v. माझ्यामुळे हजारो <u>लोकांना</u> <u>आनंद</u> मिळतो.

vi. माझ्या <u>वडिलांकडून</u> मी <u>प्रामाणिकपणा</u> शिकलो.

| क्र. | सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
|---|---|---|---|
| i. | ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |
| ii. | ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |
| iii. | ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |
| iv. | ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |
| v. | ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |
| vi. | ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |

## ८. खालील शब्दांना की, ई, ता, वा, पणा, आई हे प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार करा.

*i. सुंदर – ------------------------------

*ii. नवल – ------------------------------

*iii. दांडगा – ------------------------------

*iv. पाटील – ------------------------------

*v. प्रामाणिक – ------------------------------

*vi. गोड – ------------------------------

*vii. शांत – ------------------------------

*viii. चपळ – ------------------------------

ix. क्रूर – ------------------------------

x. धीट – ------------------------------

xi. मालक – ------------------------------

xii. गार – ------------------------------

Sample Content

***९. खालील भाववाचक नामांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

i. मित्रत्व × ------------------------ ii. गरिबी × ------------------------

iii. खरेपणा × ------------------------ iv. महागाई × ------------------------

***१०. खाली दिलेल्या शब्दांसारखे (भाववाचक नामे) अन्य शब्द लिहा.**

i. मनुष्यत्व – ------------------------

ii. आपुलकी – ------------------------

iii. नम्रता – ------------------------

iv. नवलाई – ------------------------

v. बालपण – ------------------------

vi. माधुर्य – ------------------------

## सर्वनाम

**आपण लिहिताना अथवा बोलताना एकाच नामाचा वापर वारंवार न करता त्याऐवजी जो शब्द वापरतो त्याला 'सर्वनाम' असे म्हणतात.**

**उदा.** **अजय** शाळेतून घरी आला. **अजयने** दप्तर ठेवले. **अजयला** भूक लागली होती. **अजयचे** हातपाय धुऊन झाल्यावर **अजयला** आईने खाऊ दिला.

यामध्ये 'अजय' हे नाम वारंवार आले आहे. त्याऐवजी सर्वनामे वापरून आपण ही वाक्ये लिहू शकतो.

**अजय** शाळेतून घरी आला. **त्याने** दप्तर ठेवले. **त्याला** भूक लागली होती. **त्याचे** हातपाय धुऊन झाल्यावर **त्याला** आईने खाऊ दिला.

येथे 'अजय' या नामाऐवजी वापरलेले शब्द म्हणजेच सर्वनामे आहेत.

मूळ सर्वनामे नऊ आहेत. **मी**, **तू**, **तो** (ती, ते, त्या), **हा** (ही, हे, ह्या), **जो** (जी, जे, ज्या), **कोण**, **आपण**, **काय**, **स्वतः** अशी नऊ सर्वनामे सामान्यपणे वाक्यात नामाऐवजी वापरली जातात.

**सर्वनामांचे प्रकार**

- पुरुषवाचक सर्वनाम
  - प्रथम पुरुषवाचक
  - द्वितीय पुरुषवाचक
  - तृतीय पुरुषवाचक
- दर्शक सर्वनाम
- संबंधी सर्वनाम
- प्रश्नार्थक सर्वनाम
- सामान्य सर्वनाम
- आत्मवाचक सर्वनाम

**[टीप :** या वर्षीच्या अभ्यासक्रमात आपण सर्वनामाचे पुरुषवाचक, दर्शक, संबंधी, प्रश्नार्थक सर्वमान हे चार प्रकार अभ्यासणार आहोत.**]**

१. **पुरुषवाचक सर्वनाम :** बोलणारा किंवा लिहिणारा स्वत:बद्दल बोलताना, तसेच ज्याच्याशी बोलतो तो आणि ज्याच्याविषयी बोलतो त्याच्याबद्दल जी सर्वनामे वापरतो त्यांना 'पुरुषवाचक सर्वनामे' म्हणतात. याचे तीन प्रकार आहेत. बोलणारा स्वत:विषयी बोलताना जी सर्वनामे वापरतो त्यांना 'प्रथम पुरुषवाचक सर्वनामे' म्हणतात. बोलणारा ज्याच्याशी बोलतो त्याच्यासाठी जी सर्वनामे वापरतो त्यांना 'द्वितीय पुरुषवाचक सर्वनामे' म्हणतात. बोलणारा ज्याच्याविषयी बोलतो त्यांच्यासाठी जी सर्वनामे वापरतो त्यांना तृतीय पुरुषवाचक सर्वनामे म्हणतात.

Sample Content

उदा.

| पुरुषवाचक सर्वनाम | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुषवाचक | मी (स्वत:) | आम्ही |
| द्वितीय पुरुषवाचक | तू (आपण) | तुम्ही |
| तृतीय पुरुषवाचक | तो, ती, ते | ते, त्या, ती |

२. **दर्शक सर्वनाम :** ज्या सर्वनामांनी दूरची किंवा जवळची वस्तू, पदार्थ किंवा प्राणी दाखवला जातो त्यांना 'दर्शक सर्वनामे' असे म्हणतात.

**उदा.** हा, ही, हे, तो, ती, ते.

हा, ही, हे या सर्वनामांनी जवळची वस्तू, पदार्थ किंवा प्राणी दाखवला जातो.

तो, ती, ते या सर्वनामांनी दूरची वस्तू, पदार्थ किंवा प्राणी दाखवला जातो.

३. **संबंधी सर्वनाम :** वाक्यात पुढे येणाऱ्या दर्शक सर्वनामाशी संबंध दाखवणाऱ्या सर्वनामांना 'संबंधी सर्वनामे' असे म्हणतात.

**उदा.** **जे** चमकते **ते** सोने नसते.

या वाक्यातील 'ते' हे दर्शक सर्वनाम असून त्याच्याशी संबंध दर्शवणारे 'जे' हे संबंधी सर्वनाम आहे.

४. **प्रश्नार्थक सर्वनाम :** एखाद्या नामाला प्रश्न विचारण्यासाठी वापरलेल्या प्रश्नसूचक शब्दाला 'प्रश्नार्थक सर्वनाम' असे म्हणतात.

**उदा.** पक्षी कोणी पाळला आहे ?

यातील 'कोणी' हे प्रश्नार्थक सर्वनाम आहे ज्याचे उत्तर एखाद्या व्यक्तीचे नाव असू शकेल.

## सराव कृती

**१. खालील संवाद वाचा. अधोरेखित सर्वनामांचे प्रथम पुरुषवाचक, द्वितीय पुरुषवाचक व तृतीय पुरुषवाचक असे वर्गीकरण करा.**

**रसिका :** दादा, <u>तू</u> <u>मला</u> बाजारात नेशील का ?

**दादा :** <u>तुला</u> बाजारात कशाला जायचे आहे ?

**रसिका :** <u>मला</u> रंगपेटी आणायची आहे.

**दादा :** आई आणि आत्याबरोबर जा.

**रसिका :** <u>त्या</u> लग्नाला जाणार आहेत.

**दादा :** मग ताईला घेऊन जा.

**रसिका :** <u>ती</u> मैत्रिणीकडे गेली आहे.

**दादा :** अगं, <u>मी</u> नाही येऊ शकत. आता <u>माझे</u> मित्र येतील. <u>आम्हांला</u> प्रकल्प करायचा आहे. <u>ते</u> येणार आहेत म्हटल्यावर <u>त्यांना</u> सोडून कसा येऊ ?

**रसिका :** ठीक आहे. बाबा म्हणाले आहेत, दादाला विचार. <u>तो</u> नाही आला, तर <u>आपण</u> जाऊ.

| प्रथम पुरुषवाचक सर्वनाम | द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम | तृतीय पुरुषवाचक सर्वनाम |
|---|---|---|
| ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |
| ------------------------------ | ------------------------------ | ------------------------------ |

Sample Content

## २. खालील वाक्यांतील संबंधी सर्वनामे ओळखून लिहा.

*i. ज्यांनी बचत केली, त्यांनी आपले भविष्य सुरक्षित केले. – ----------------

*ii. ज्याला खुंटावरचा खो-खो खेळता येतो, त्याला गोल खो-खो खेळता येतोच. – ----------------

*iii. जे दुसऱ्याला मदत करतात, ते लोकप्रिय होतात. – ----------------

iv. जो लवकर उठतो तो निरोगी राहतो. – ----------------

v. जिला तालबद्ध उड्या मारता येतात, तिला लेझीम संघात सहभाग घेता येईल. – ----------------

## ३. खालील वाक्ये वाचा व दर्शक सर्वनामे ओळखा.

i. हा मुलांचा संघ कोणाचा? – ----------------

ii. ही फुलांची माळ सुहासने बनवली. – ----------------

iii. हे क्रिकेटचे मैदान खूप मोठे आहे. – ----------------

iv. तो यशवंतरावांचा मुलगा आहे. – ----------------

## *४. खालील वाक्यांतील सर्वनामांना अधोरेखित करा.

i. राधा म्हणाली, "प्रशांत, तू किती छान गाणे गातोस."

ii. ती माझी बहीण आहे.

iii. कोणी कोणाशी भांडू नये.

iv. ज्याला बाहेर फिरायला जायचे आहे, त्याला मी घेऊन जाईन.

v. मला कोणी काही विचारू नये.

vi. सदा माधवच्या बाबांना म्हणाला, 'हा मला त्रास देतो, त्याला मी समजावून सांगितले; पण तो त्याचेच म्हणणे खरे करतो.'

## *५. गाळलेल्या जागी कंसातील योग्य सर्वनाम लिहा.

i. ---------------- वह्या मुलांना द्या. (हा, ही, ह्या)


ii. त्याला ---------------- आवडते? (काय, कोणते, कोणी)

iii. ---------------- आकाशकंदील बनवले. (तू, आम्ही, कोणी)

iv. मी ---------------- स्वयंपाकघर स्वच्छ केले. (आपण, स्वत:, त्याने)

v. त्याने ---------------- काही सांगितले नाही. (कोणाला, कोणी, काय)

## *६. खालील चित्र पाहून रिकाम्या जागी योग्य पुरुषवाचक सर्वनाम लिहा.



i. ---------------- आज पतंग उडवणार आहे.

ii. ---------------- पतंग छान उडवते.

iii. मैदानावर ---------------- पतंग घेऊन गेलो.

iv. ---------------- पतंग उडवूया.

v. पतंग उडवण्यात ---------------- तरबेज आहेत.

Sample Content

## *७. खाली दिलेल्या सर्वनामांचा उपयोग करून वाक्ये लिहा.

i. कोण – ----------

ii. काय – ----------

iii. हे – ----------

iv. कोणाचा – ----------

v. ती – ----------

vi. ही – ----------

## ८. खालील वाक्यांतील सर्वनामे ओळखून प्रकार लिहा.

i. मी आहे सायकल!

**उत्तर :** ----------

ii. तुम्हांला वेगळा व्यायाम करण्याची गरज पडणार नाही.

**उत्तर :** ----------

iii. रामेश्वरमध्ये येणाऱ्या वर्तमानपत्रांचा तो एकुलता एक वितरक होता.

**उत्तर :** ----------

iv. तिनं जे अंथरुण धरलं, ते सोडलंच नाही.

**उत्तर :** ----------

## *९. खाली दिलेल्या वाक्यांत अधोरेखित नामांच्या जागेवर योग्य सर्वनामे लिहा व वाचा.

समीरा गुणी मुलगी आहे. समीरा नेहमी हसतमुख असते. समीराला गोष्टी सांगायला आवडतात. समीराच्या गोष्टी सगळे मन लावून ऐकतात. समीराने खो-खो खेळात बक्षीस मिळवले आहे.

**उत्तर :** ----------

----------

### विशेषण

**नामाविषयी अधिक विशेष माहिती सांगणारा शब्द म्हणजे 'विशेषण' होय.**

**उदा. उंच** मुलगा, **लाल** रुमाल, **भगवा** रंग, **हिरवे** झाड, **एक** गाव, **अनेक** मुले.

विशेषणामुळे ज्या नामाबद्दल विशेष माहिती मिळते त्या नामाला 'विशेष्य' असे म्हणतात.

म्हणजेच वरील उदाहरणातील 'विशेष्य' व 'विशेषणे' खालीलप्रमाणे आहेत.

| विशेष्य | विशेषण |
|---|---|
| मुलगा | उंच |
| रुमाल | लाल |
| रंग | भगवा |

| विशेष्य | विशेषण |
|---|---|
| झाड | हिरवे |
| गाव | एक |
| मुले | अनेक |



Sample Content

**विशेषणांचे प्रकार**

गुणवाचक विशेषण | संख्यावाचक विशेषण | सार्वनामिक विशेषण

१. **गुणवाचक विशेषण :** ज्या विशेषणामुळे आपल्याला नामाचा गुण समजतो त्याला 'गुणवाचक विशेषण' म्हणतात.
**उदा.** गंगा **पवित्र** नदी आहे. हिमालय **उंच** पर्वत आहे. राहुल **हुशार** मुलगा आहे.

२. **संख्यावाचक विशेषण :** ज्या विशेषणामुळे आपल्याला नामाची संख्या किंवा प्रमाण समजते त्याला 'संख्यावाचक विशेषण' म्हणतात.
**उदा.** **चार** मुली खेळायला आल्या. आईने **दोन** लिटर दूध आणले. सभेला **अनेक** लोक आले होते.

३. **सार्वनामिक विशेषण :** वाक्यातील सर्वनाम जेव्हा त्याच्या पुढे येणाऱ्या नामाबद्दल अधिक माहिती देते, म्हणजे ते विशेषणाचे कार्य करते त्या सर्वनामांना 'सार्वनामिक विशेषण' असे म्हणतात.
**उदा.** **ही** खारुताई रोज येते. **माझी** वही तुझ्याकडे आहे का?
काल **त्याचा** रुमाल मला सापडला.
मी, तू, तो, हा, जो, कोण, काय ही सर्वनामे सार्वनामिक विशेषण म्हणून वापरताना त्यांच्या मूळ स्वरूपात न येता त्यात बदल होतो.

| सर्वनाम | सार्वनामिक विशेषण |
|---|---|
| मी | माझा, माझी, माझे |
| तू | तुझा, तुझी, तुझे |
| तो | त्याचा, त्याची, त्याचे |
| ती | तिचा, तिची, तिचे |
| आम्ही | आमचा, आमची, आमचे |
| तुम्ही | तुमचा, तुमची, तुमचे |

| सर्वनाम | सार्वनामिक विशेषण |
|---|---|
| हा | असा, असला, इतका, अमका |
| तो | तसा, तसला, तितका, तेवढा, तमका |
| जो | जसा, जसला, जितका, जेवढा |
| कोण | कोणता, केवढा |
| काय | कसा, कसला |

## सराव कृती

***१. खालील शब्दसमूहांतील नाम व विशेषण यांचे सारणीनुसार वर्गीकरण करा.**

पिवळसर गुलाब, मोठा चेंडू, मसालेदार भाजी, लालचुटूक कळी, स्वच्छ रुमाल, टवटवीत चेहरा, निळेशार पाणी, रागीट घोडा

| नाम | विशेषण |
|---|---|
| ------------------- | ------------------- |
| ------------------- | ------------------- |
| ------------------- | ------------------- |
| ------------------- | ------------------- |

| नाम | विशेषण |
|---|---|
| ------------------- | ------------------- |
| ------------------- | ------------------- |
| ------------------- | ------------------- |
| ------------------- | ------------------- |

Sample Content

***२. खालील वाक्यांतील विशेषण ओळखा.**

हुशार कावळा, आंबट बोरे, कच्चा आंबा, उंच इमारत, काळा खडक, हिरवागार पोपट.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

***३. खालील वाक्यांत मोकळ्या जागी कंसात दिलेल्या गुणवाचक विशेषणांपैकी योग्य विशेषण लिहा.**

(पांढरे, प्रचंड, भव्य, जाडेभरडे, आंबट)

i. समुद्रात ------------------------ लाटा उसळतात.

ii. तिच्या अंगावर ------------------------ कपडे होते.


iii. मला ------------------------ फूल आवडते.

iv. मी खाल्लेली संत्री ------------------------ होती.

v. आबासाहेबांनी ------------------------ वाडा बांधला.

**४. पुढील चित्राचे निरीक्षण करा आणि रिकाम्या जागी कंसातील योग्य संख्यावाचक विशेषण लिहा.**

(एक, दोन, तीन, तिप्पट, असंख्य)



i. ---------------- मुले खेळत आहेत.

ii. मुलांच्या शेजारी ---------------- मांजर आहे.

iii. ---------------- मुले एकमेकांशी बोलत आहेत, तर शेजारी मुलगी उभी आहे.

iv. मांजराच्या ---------------- मुले आहेत.

v. घरावर ---------------- कौले आहेत.

***५. खालील परिच्छेदातील संख्याविशेषणे अधोरेखित करा.**

अल्लाउद्दीन व फरिदा दोघे शाळेत निघाले. वाटेत एक भेळेचे दुकान होते. दुकानात अनेक प्रकारची चिक्की व फुटाणे मिळत असत. फरिदाकडे पाच रुपयांचे नाणे होते. तिने अडीच रुपयांत शेंगदाण्याच्या चिक्कीचे पाकीट घेतले, तर अल्लाउद्दीनने उरलेल्या अर्ध्या पैशांत फुटाणे घेतले. सगळे पैसे संपले. भरपूर फुटाणे आले. पसाभर फुटाणे त्याने फरिदाला दिले, तर तिने थोडीशी चिक्की अल्लाउद्दीनला दिली.

***६. खालील वाक्यांतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या संख्यावाचक विशेषणांपैकी योग्य विशेषण लिहा.**

(एकेक, सहस्र, द्‌विगुणित, दुप्पट, पाच)

i. अविनाशला ------------------------ भाषा येतात.

ii. सूर्याच्या ------------------------ किरणांनी जमिनीला स्पर्श केला.

iii. ------------------------ बेडूक उड्या मारत पसार झाले.

Sample Content

iv. आईला पाहताच तिचा आनंद ------------------------ झाला.

v. भुकेच्या तडाख्यात मीनाने ------------------------ चपात्या खाल्ल्या.

## *७. खालील वाक्यांतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या सार्वनामिक विशेषणांपैकी योग्य विशेषण घाला.

(इतका, जेवढा, तुमचा, तिचा, जसा, तेवढे)

i. बाबांनी विचारले, “ ------------------------ वेळ कुठे होतास?”

ii. ------------------------ चेहरा उन्हाने लालेलाल झाला.

iii. मला वाटते, “ ------------------------ कचरा जास्त ------------------------ प्रदूषण जास्त.”

iv. ------------------------ मुलगा खूप हुशार आहे.

v. ------------------------ अंगरखा तशीच टोपी घालून तो मंचावर आला.

## *८. खालील नामांना दोन-दोन विशेषणे लिहा.

**उदा. हिमालय - उंच, बर्फाच्छादित**

i. भाजी – ------------------------------

ii. घर – ------------------------------

iii. विद्यार्थी – ------------------------------

iv. बाहुली – ------------------------------

v. लोक – ------------------------------

## *९. ‘आतां उजाडेल!’ या कवितेत खालील शब्दांना लावलेली विशेषणे लिहा.

i. ------------------------------ आनंदाच्या लाटा.

ii. ------------------------------ आकाश.

iii. ------------------------------ गळ्यांत.

iv. ------------------------------ गारवा.

## १०. खालील वाक्यांतील विशेषणे ओळखून प्रकार लिहा.

i. पहिली दोनशे वर्षे मी रखडत चालले.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

ii. पुस्तकं म्हणजे माझ्यासाठी एक दुर्मिळ वस्तू होती.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

iii. आम्ही आमच्या प्रेमाने तुला बांधून ठेवणार नाही.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

iv. त्याने खिशातून शंभराची नोट काढली.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

Sample Content

v. तिचा प्रत्येक शब्द माझ्या अंतरंगाचा ठाव घेत होता.

**उत्तर :** ----------------------------------------

vi. सुगंधी पेटीचा एक एक खणच उघडत चालला होता.

**उत्तर :** ----------------------------------------

## ११. खालील वाक्यांतील अधोरेखित विशेषणांचा प्रकार ओळखा.

i. सिनेमाला पुष्कळ लोक आले होते.

**उत्तर :** ----------------------------------------

ii. असला नवरा काही कामाचा नाही.

**उत्तर :** ----------------------------------------

iii. चांगला मुलगा सर्वांना आवडतो.

**उत्तर :** ----------------------------------------

iv. माझा आनंद द्विगुणित झाला.

**उत्तर :** ----------------------------------------

### क्रियापद

**वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा वाक्यातील क्रियावाचक शब्द म्हणजे 'क्रियापद' होय.**

**उदा.** कृष्णाने बासरी **वाजवली**.
विद्याने आंबा **खाल्ला**.
भूषणने पुस्तक **वाचले**.
नितेशने पतंग **उडवला**.

वाक्यातील क्रियापदांना आपण ती क्रिया करणारा कोण? असा प्रश्न विचारला, तर मिळणारे उत्तर हा त्या वाक्याचा 'कर्ता' असतो. वाक्यातील क्रियापदाला 'काय' असा प्रश्न विचारल्यावर मिळणारे उत्तर हे 'कर्म' असते. म्हणजेच, वाक्यातील क्रिया करणारा 'कर्ता' तर ज्यावर क्रिया घडते ते 'कर्म' असते.

वरील वाक्यांच्या साहाय्याने खालील तक्ता पूर्ण करू.

| क्रियापद | 'कोण' ने प्रश्न | उत्तर (कर्ता) | 'काय' ने प्रश्न | उत्तर (कर्म) |
|---|---|---|---|---|
| वाजवली | कोणी वाजवली? | कृष्ण | काय वाजवली? | बासरी |
| खाल्ला | कोणी खाल्ला? | विद्या | काय खाल्ला? | आंबा |
| वाचले | कोणी वाचले? | भूषण | काय वाचले? | पुस्तक |
| उडवला | कोणी उडवला? | नितेश | काय उडवला? | पतंग |

**क्रियापदांचे प्रकार**

सकर्मक | अकर्मक | संयुक्त | सहाय्यक

Sample Content

१. **सकर्मक क्रियापद :** क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता असेल, तर ते 'सकर्मक क्रियापद' असते.
**उदा.** रोहन चेंडू पकडतो.
(कर्ता) (कर्म) (क्रियापद)
लता पाणी पिते.
(कर्ता) (कर्म) (क्रियापद)
या वाक्यात कर्म नसेल, तर क्रियापदाचा अर्थ पूर्ण होत नाही.

२. **अकर्मक क्रियापद :** क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता नसेल, तर ते 'अकर्मक क्रियापद' असते.
**उदा.** माया पलंगावर बसली.
(कर्ता) (क्रियापद)
बजरंग गावाला गेला.
(कर्ता) (क्रियापद)
या क्रियापदांना 'काय' असा प्रश्न विचारला, तर कोणतेही उत्तर मिळत नाही.

३. **सहाय्यक क्रियापद :** कधी कधी वाक्याचा अर्थ पूर्ण होण्यासाठी मुख्य क्रियावाचक शब्दाला दुसऱ्या एखाद्या क्रियापदाचे सहाय्य घ्यावे लागते. या क्रियापदाला सहाय्यक क्रियापद म्हणतात.
**उदा.** मैदानावर खेळाडू धावू **लागले**.
सीता पुस्तक वाचत **होती**.
यामध्ये क्रियावाचक शब्द 'धाव' याचे 'धावू' हे धातुसाधित, तर 'वाच' याचे 'वाचत' हे धातुसाधित झाले आहे. मूळ क्रिया किंवा धातू वाक्यात सहाय्यक क्रियापदाबरोबर येताना त्यात जो बदल होतो त्याला **धातुसाधित** किंवा **कृदन्त** असे म्हणतात.
**उदा.** खेळ - खेळत, खेळू, खेळणारा, खेळून, खेळता, खेळणे.

४. **संयुक्त क्रियापद :** मुख्य क्रियावाचक शब्द आणि त्याला सहाय्य करणारे क्रियापद या दोघांचे मिळून जे क्रियापद तयार होते, त्याला संयुक्त क्रियापद असे म्हणतात.
**उदा.** मैदानावर खेळाडू **धावू लागले**.
सीता पुस्तक **वाचत होती**.
यामध्ये 'धावू लागले', 'वाचत होती' ही संयुक्त क्रियापदे आहेत. म्हणजेच,
**धातुसाधित + सहाय्यक क्रियापद = संयुक्त क्रियापद.**

## सराव कृती

***१. पुढील वाक्ये वाचा व त्यांतील कर्ता, कर्म, क्रियापद ओळखा.**

| क्र. | वाक्य | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| i. | तारा क्रिकेट खेळते. | ---------------------- | ---------------------- | -------------------- |
| ii. | यास्मीन पुस्तक वाचते. | ---------------------- | ---------------------- | -------------------- |
| iii. | पक्षी किलबिल करतात. | ---------------------- | ---------------------- | -------------------- |
| iv. | राजू अभ्यास करतो. | ---------------------- | ---------------------- | -------------------- |



Sample content

| | | | | |
|---|---|---|---|---|
| v. | शबाना स्वयंपाक करते. | | | |
| vi. | जॉन व्यायाम करतो. | | | |

***२. पुढील वाक्ये वाचा व त्यांतील कर्ता, कर्म आणि क्रियापद ओळखून तक्त्यात लिहा.**

| क्र. | वाक्य | कर्ता | कर्म | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| i. | तेजवंत फुटबॉल खेळतो. | | | |
| ii. | शिक्षक कविता गातात. | | | |
| iii. | निशा निबंध लिहिते. | | | |
| iv. | जोसेफ रस्त्यात पडला. | | | |
| v. | दादा घरी आला. | | | |
| vi. | सुरेश उद्या पुण्याला जाईल. | | | |

***३. पुढील क्रियापदे सकर्मक की अकर्मक ते ओळखा व रिकाम्या जागेत लिहा.**

i. आई भाकरी करते. ----------------

ii. गणेश रस्त्यात पडला. ----------------

iii. उद्या दिवाळी आहे. ----------------

iv. अनुराधा पत्र लिहिते. ----------------

v. सुरेखाचे डोके दुखते. ----------------

vi. गाई झाडाखाली बसल्या. ----------------

**४. खालील धातूंपासून धातुसाधित तयार करा.**

**मूळ धातू** **धातुसाधिते**

*i. बोल – ----------------

*ii. कर – ----------------

*iii. धाव – ----------------

iv. नाच – ----------------

v. दे – ----------------

Sample Content

## ५. खालील वाक्यांतील संयुक्त क्रियापदे अधोरेखित करा.

*i. मुले योगासनाची प्रात्यक्षिके पाहायला गेली.
*ii. पालक मुलांसाठी सतत राबत असतात.
*iii. गणूने सर्व कामे झटपट आटपून घेतली.
*iv. मला चित्रे रेखाटायला आवडते.
v. गवई गाणे गाऊ लागला.
vi. मी चित्रे रंगवत असतो.

## ६. खालील तक्ता पूर्ण करा.

| क्र. | उदाहरण | मुख्य धातूचे कृदन्त | सहाय्यक क्रियापद | संयुक्त क्रियापद |
|---|---|---|---|---|
| i. | सुरेश समुद्रात पोहू शकतो. | ---------------- | ---------------- | ---------------- |
| ii. | चोर पोलिसाला पाहून पळाला. | ---------------- | ---------------- | ---------------- |
| iii. | आरोपीला आपली बाजू मांडू दे. | ---------------- | ---------------- | ---------------- |
| iv. | पोस्टमन हल्ली रोज येऊ लागला. | ---------------- | ---------------- | ---------------- |

## ७. खालील वाक्यांतील क्रियापदे ओळखा.

i. हा झाला आरोग्याचा फायदा. – ------------------------------
ii. सन १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध पेटले. – ------------------------------
iii. तुमच्यामुळं हे सारं घडलं. – ------------------------------

## ८. खालील वाक्यांतील क्रियापदे ओळखून सकर्मक, की अकर्मक ते लिहा.

i. वैमानिक विमान चालवतो.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

ii. तिने अजयला सहलीची फी दिली.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

iii. अजय बसखाली उतरला.

**उत्तर :** ------------------------------------------------------------

## ९. खालील वाक्यांच्या आधारे पुढील तक्ता पूर्ण करा.

i. कार चालवायची असेल, तर चालक परवाना काढावा लागतो.
ii. भारताला सक्तीने युद्धात सामील व्हावे लागेल.

| क्र. | मूळ धातू | धातुसाधित (कृदन्त) | सहाय्यक क्रियापद | संयुक्त क्रियापद |
|---|---|---|---|---|
| i. | ------------------ | ------------------ | ------------------ | ------------------ |
| ii. | ------------------ | ------------------ | ------------------ | ------------------ |

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VI:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### NOTES
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास - नागरिकशास्त्र व भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

## AVAILABLE BOOKS FOR STD. VII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### NOTES
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### ADDITIONAL TITLES
- English Grammar & Writing Skills Book
- Hindi Grammar & Writing Skills Book
- Marathi Grammar & Writing Skills Book




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

### OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery



Explore our range of STATIONERY

Marketed by:
Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.
**Address:**
B2, 9th Floor, Ashar, Road No. 16/Z,
Wagle Industrial Estate, Thane (W)- 400604
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org

Visit Our Website